**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai 400 020.
Phone : +91 22 2203 1879
Fax : +91 22 2201 6226

SNDT WOMEN'S UNIVERSITY
Estb: 1916

**श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापिठ**
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग,
मुंबई ४०० ०२०.
Telegram : UNIWOMEN
Website : sndt.ac.in

**A - Grade (CGPA 3.08)**

**संदर्भ क्र.** आरईजी/१४२/२०१९-२०२०/४२८

दि. १७/०३/२०२०

# परिपत्रक

**विषय:- राज्यात कोरोना विषाणू (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.**

**संदर्भ:- क्र. उशिस/कोरोना/मवि-१/२०२०/३८१९, दि. मार्च १६, २०२०.**

उपरोक्त विषयाच्या व संदर्भाधीन शासकीय परिपत्रकांच्या अनुषंगाने शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत अधिसूचना निर्गमित केली आहे. या अनुषंगाने विद्यापीठ,विद्यापीठ संचलित आणि सलग्नित महाविद्यालये, सर्व संस्थाचालक, प्राचार्य, संचालक, विद्यार्थी, वसतीगृह अधिक्षक व सर्व शैक्षणिक विभागातील शिक्षकांना व शिक्षकेत्तर कर्मचा-याना पूढीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१. तंत्र शिक्षण / उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व अकृषी विद्यापीठे / तंत्रशास्त्र विद्यापीठे / सर्व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे / सर्व अभिमत विद्यापीठे व त्यांच्याशी संबंधित सर्व शासकीय / अशासकीय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित / मॉडेल डिग्री महाविद्यालये / तंत्रनिकेतने / अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये / वसतीगृहे व परिसंस्था तसेच कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्था दि. ३१/०३/२०२० पर्यंत बंद राहतील.

२. दिनांक ३१.३.२०२० पर्यंत होणा-या सर्व परिक्षा व प्रात्यक्षिके परिक्षा पूढे ढकलण्यात येत आहेत. दिनांक १ एप्रिल २०२० पासूनची परीक्षा व प्रात्यक्षिके पूर्व नियोजित वेळापत्रकानुसार होतील.

३. सर्व सरकारी / अनुदानित / खाजगी शैक्षणिक संस्था / महाविद्यालये / अकृषि विद्यापीठे / तंत्रशास्त्र विद्यापीठे / तंत्रनिकेतने / अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / कला महाविद्यालये या मधील सर्व अध्यापक हे दि. २५/०३/२०२० पर्यंत घरी राहून कामकाज (Work from Home) करू शकतील.

तथापि, आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास / प्रशासकीय कारणास्तव संबंधित विद्यापीठाचे कुलगुरु / उप-कुलगुरू / कुलसचिव / उपकुलसचिव तसेच महाविद्यालयाचे /तंत्रनिकेतनांचे प्राचार्य / संचालक / अधिष्ठाता यांनी निर्देश दिल्यास त्यानुसार अध्यापकांना संस्थेमध्ये तातडीने हजर राहणे बंधनकारक राहील.

४. विद्यापीठाचे कुलगुरू / उप- कुलगुरू / कुलसचिव / उपकुलसचिव तसेच महाविद्यालयाचे /तंत्रनिकेतनांचे प्राचार्य / संचालक / अधिष्ठाता व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी नियमितरित्या कार्यालयामध्ये उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील विषयाबाबत शासनाकडून सुधारीत आदेश प्राप्त झाल्यानंतर सर्व संबंधितांना त्याबाबत कळविण्यात येईल.

दिदेशपांडे
**(डॉ. दिपक देशपांडे)** १७/३/२०२०
**कुलसचिव**